■ RNI NO. MAHMAR/2020/79996 नवे विचार...नवी सुरुवात ■ Postal Reg. No. SGL/135/2025-2027

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ६७ ■ मंगळवार, १० जून २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# मिरजकरांची नजर महापालिकेवर?

## रणधुरंधर नवे डाव टाकण्याच्या तयारीत; अन् कुरूक्षेत्रावर 'रण' पेटल्याने सर्वच योध्दे मैदानात !









**मिरज : हॅलो प्रभात**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण आता चांगलेच तापले आहे. पक्ष विधिनिषेध न बाळगता निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत असलेल्या मिरजेतील राजकारण्यांची नजर सांगली महापालिकेवर आहे. नवे डाव टाकण्याच्या रणनितीला आतापासूनच प्रारंभ झाला आहे. जिल्हा नेतृत्वाला घाईला आणलेले मिरजेतील रणधुरंधर कोणता डाव टाकणार याबाबत पक्षश्रेष्ठीदेखील संभ्रमात आहेत, परंतु २०२५ च्या महापालिका निवडणुकीत मिरजकर निश्चितच नवी रणनिती अवलंबतील, असा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे.**

गत महापालिका निवडणुकीत मिरजेत भाजपने बाजी मारली असली तरी सध्याची स्थिती मात्र तशी नाही, महायुतीतून निवडणूक लढविणे भाजपची गरज बनलेली आहे. निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय झाला तर याचा मिरजेच्या राजकारण्याच्या दृष्टिकोनातून भाजपलाच नव्हे तर महाविकास आघाडीलादेखील तडाखा बसणार आहे. मिरजेच्या राजकारणात राष्ट्रवादी अजितदादा पक्षाचे आ.इद्रिस नायकवडी, काँग्रेस नेते किशोर जामदार, तर भाजप नेते सुरेश आवटी ही नावे प्रामुख्याने घेतली जातात. जिल्ह्यातील राजकारण कोणत्याही वळणाने जाऊ दे, पण ते आपल्याकडे वळविण्यात हे नेते चतुर आहेत. अजितदादांनी स्थानिक स्वराज्य संस्था विशेषत; सांगली महापालिकेची सत्ता विचारात घेऊनच इद्रिस नायकवडी यांना आमदारपद दिले. जिल्हा नेतृत्वालाही धोबीपछाड दिलेले नेतृत्व अशीच नायकवडी यांची प्रतिमा आहे, तर किशोर जामदार आतापर्यंत काँग्रेसचे राजकारण करत आले आहेत, मदनभाऊ पाटील यांचे कट्टर समर्थक असेच त्यांना ओळखले जाते. मदनभाऊंच्या पत्नी जयश्रीताई पाटील यांनी समर्थकांच्या घेतलेल्या बैठकीत किशोर जामदार यांचे पुत्र माजी नगरसेवक करण जामदार आवर्जून उपस्थित होते, तर सुरेश आवटी यांचे राजकारण संपूर्ण जिल्ह्याला चांगल्यारितीने परिचित आहे. माजी महापौर मैनुद्दिन बागवान यांना मात्र शिरकाव करू न देण्याचा या नेत्यांचा राजकीय डाव यशस्वी झाला आहे.

'आपण सारे भाऊ, भाऊ... मिळेल ते वाटून खाऊ' अशीच रणनिती आतापर्यंत मिरजकरांची राहिलेली आहे. त्यामुळेच स्वबळावर असो की आघाडी करून असो, त्याचा काहीच परिणाम मिरजेतील राजकारणावर होणार नाही. मिरजेत आपले समर्थक अधिक संख्येने कसे निवडून आणता येतील याकडेच मिरजेतील नेत्यांचा कटाक्ष राहणार आहे. त्यामुळे महापालिकेवर सत्ता आणणे सोयीचे होणार आहे, त्या दृष्टिकोनातूनच रणनिती आखली जात असून प्रसंगी हे नेते एकत्र आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही, असे राजकीय जाणकारांतून बोलले जात आहे.

# गौरव नायकवडी यांना महामंडळाचे अध्यक्षपद मिळावे

## स्वामी समर्थ महाराजांना मुस्लिम समाजाकडून साकडे

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील गौरवभाऊ नायकवडी यांचे खंदे समर्थक व शिवसेनेचे युवा नेते अमीर हवलदार यांनी मुस्लिम समाजातील युवकांना घेऊन अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांना क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी धरण व प्रकल्पग्रस्त महामंडळाच्या अध्यक्षपदी गौरव भाऊ नायकवडी यांना संधी मिळावी यासाठीचे साकडे घालण्यात आले. यावेळी त्यांच्याबरोबर मुस्लिम युवक व स्वामी समर्थ भक्त उपस्थित होते.



वारणा व धरणग्रस्त साठी महामंडळाची स्थापना व्हावी या मागणीसाठी धरण व प्रकल्पग्रस्त लोकांनी अनेक वर्षापासून सरकारकडे मागणी करत होते. धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संघटनानी यासाठी अनेक आंदोलने केली. महामंडळ स्थापना व्हावे यासाठी पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांनी सुद्धा प्रयत्न केले होते. त्यांच्या पश्चात त्यांचे नातू गौरव नायकवडी यांनी त्यासाठीचा पाठपुरावा केला होता. याची दखल घेऊन माजी मुख्यमंत्री व तत्कालीन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदर विषयाचे गांभीर्य बघून क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी धरण व प्रकल्पग्रस्त महामंडळाची स्थापना केली. महामंडळाची स्थापना होतात मंत्रीमंडळाचा बैठकीमध्ये एकनाथराव शिंदे यांनी तात्काळ महामंडळाला निधी उपलब्ध करून दिला. महामंडळ स्थापना झाल्यापासून सदर महामंडळाचे अध्यक्षपद रिक्त आहे. त्यामुळे वारणा व प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासाठी मुस्लिम समाजाच्या युवकांनी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी साकडे घातले.

यावेळी हवलदार म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी या महामंडळाची स्थापना केली आहे. आमचे नेते गौरव भाऊ नायकवडी यांना अध्यक्ष पद मिळावे असे आमच्या सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे. महायुती सरकारने महामंडळाची निवड लवकर करावी. गौरव भाऊंसारख्या तडपदार व कार्यकर्त्यांना बळ देणाऱ्या भाऊची महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड करावी.

यावेळी श्री स्वामी समर्थ महाराज चरणी मुस्लिम समाजाचे शरीफ शिकलगार, आयुब पठाण, तनवीर संदे, फैजान खान,सोनम शिंदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा लवकरच निर्णय : आबिटकर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीसाठी शासन सकारात्मक आहे. लवकरच याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत बैठक होणार असल्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. जिल्ह्यातील अनेकांचे शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश होतील, असेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. कोल्हापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हद्दवाढ होणे गरजेचे आहे, असे मंत्री आबिटकर यावेळी म्हणाले.




# शिवभारत ट्रेकर्सच्यावतीने भुईकोट गडावर ध्वजारोहण

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील शिवभारत ट्रेकर्सच्या माध्यमातून श्री शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात असलेला भुईकोट बहादुरवाडी



या गडावर २७ फुटी भगवा ध्वज प्रतापसिंह घोरपडे-सरकार यांच्या हस्ते अनावरण सोहळा पार पडला. यावेळी श्री शिवशंभू मर्दानी आखाडा, सांगलीवाडी येथील खेळाडूंनी शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिक सादर केले. शिवभारत ट्रेकर्सचे सर्व शिलेदार, पंचक्रोशीतील दुर्गप्रेमी, शिवभक्त तसेच बहादुरवाडी ग्रामस्थ कार्यक्रमास उपस्थित होते.

# 'डी. वाय.पाटील'ला फोटोकेटालिटिक डाई विघटनासाठी पेटंट

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च विभागातील संशोधकांनी फोटोकेटालिटिक डाई विघटना-







साठी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. टू सिन्थेसिस ऑफ हायली पोरस झिंक आयर्न ऑक्साईड नॅनोपार्टिकल्स फॉर फोटोकेटालिटिक डाई डिग्रेडेशन तंत्रज्ञानाला पेटंट मंजूर झाले असून विद्यापीठाला मिळालेले हे ५४ वे पेटंट आहे डॉ. विश्वजीत खोत यांच्या नेतृत्वाखाली हे संशोधन करण्यात आहे आहे. डॉ. केतकी कदम आणि डॉ. अश्विनी साळुंखे यांचा या संशोधन कार्यत सहभाग होता. यामध्ये नव्या प्रक्रियेद्वारे उच्च सच्छिद्र झिंक आयर्न ऑक्साईड नॅनोकणांचे संश्लेषण करण्यात आले आहे. ही प्रक्रिया रंगद्रव्य विघटन अधिक पर्यावरणपूरक व कार्यक्षम बनवण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

रासायनिक प्रक्रियेद्वारे विकसित करण्यात आलेली ही पद्धत तुलनेने अधिक सोपी आणि कमी खर्चिक असल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले आहे.संशोधन विभागाचे अधिष्ठाता प्रा.सी. डी.लोखंडे यांनी ही मान्यता विद्यापीठासाठी महत्त्वपूर्ण उपलब्धी असल्याचे सांगितले.

हे पेटंट पुढील २० वर्षांसाठी विद्यापीठाच्या नावे संरक्षित राहणार आहे. या उल्लेखनीय यशासाठी सर्व संशोधकांचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. शर्मा आणि कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी अभिनंदन केले आहे.




## संपादकीय

# पावसाने वेधशाळेपासून ते कावळ्यापर्यंत सगळ्यांचेच अंदाज चुकवले तर मग 'वेधशाळा कशाचा वेध घेते!'

महाराष्ट्रात दडी मारलेल्या पावसामुळे विशेषत: शेती, जलस्रोत व्यवस्थापन, वीज उत्पादन आणि सामान्य जीवनावर याचा मोठा प्रभाव पडणार आहे. पेरणीत विलंब होणार असून बहुतेक खरीप पिके भात, तूर, उडीद आदी मान्सूनच्या सुरुवातीला पेरली जातात. पावसाने दडी मारल्याने या पेरण्या लांबवल्या आहेत. पाऊस वेळेआधी दाखल झाला आणि येण्याच्या वेळेतच त्याने दडी मारली त्यामुळे जमिनीतील ओलीचे गणित बिघडले आहे. उशिराने पेरण्या केल्यास पीक वाढीला पुरेसा वेळ मिळत नाही आणि वेळेआधी पेरण्या झाल्यास जमिनीत पुरेसा ओलावा मिळत नसल्याने शेतकऱ्याची दोन्हीकडून अडचण झाली आहे. यातून बी-बियाणे, पेरणी, खते आणि मशागतीचे खर्च वाढणार असून उत्पादनावर त्याचा होणार आहे. बियाणे किंवा खतांचा वापर विहित वेळेतच केल्यास त्याचे पुरेसे लाभ मिळणार असतात. पावसाच्या लपाछपीमुळे पेरण्यांची गणिते बिघडली आहेत. पावसाने दडी मारल्याने धरणांमध्ये पाणी साठवण उशिरा होणार असल्याने रब्बी हंगामाला त्याचा फटका बसणार आहे. महाराष्ट्रात मान्सून उशिराने सक्रीय झाल्याने हवामानावर आधारित शेती, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन आणि पिकांची योग्य निवड या उपाययोजना आवश्यक आहेत. देशाच्या बहुतेक भागात मान्सूनला उशीर होण्यामागील कारणे हवामान विभागाने दिली आहेत. हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात मान्सूला पूरक अशी कोणतीही हालचाल होत नसल्यामुळे ही स्थिती निर्माण झालेली आहे. ही स्थिती आणखी काही दिवस कायम राहू शकते. त्यामुळे पेरण्यांची घाई करण्याची गरज नाही. पण हाच पेरणीचा वेळ असल्यामुळे शेतकरी आपल्या नेहमीच्या कामाला लागला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार नैऋत्य मान्सून १२ ते १८ जूनदरम्यान सक्रीय होऊ शकतो. त्यातही उशीर झाल्यास जून महिनाही पावसाविनाच जाण्याची शक्यता आहे. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. सध्या बऱ्यापैकी पाऊस पडत आहे. आयएमडीच्या माहितीनुसार १२ आणि १३ जून रोजी बंगालच्या उपसागरात मान्सूनला पोषक स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे मात्र त्यात पुरेशी निश्चिती नाही. मान्सूला पोषक स्थिती निर्माण होण्यासाठी आवश्यक घटक अद्याप पुरेसे नजरेत आलेले नाहीत. मान्सून पुन्हा सक्रीय झाल्यानंतर मध्य भारत, महाराष्ट्राच्या काही भागात आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात ज्या ठिकाणी मान्सून आधीच पोहोचलेला आहे, अशा ठिकाणी विरामानंतर चांगला पाऊस होण्याची अपेक्षा हवामान विभागाने वर्तवली आहे. परंतु सद्यस्थितीत मान्सूनच्या देशातील हालचाली मंदच आहेत. परिणामी महाराष्ट्रातील मराठवाडा, कोकण, विदर्भात मे महिन्यातच पोहचलेला पाऊस जूनमध्ये मात्र ओढ देण्याची शक्यता आहे.

पश्चिमेकडील वारे बळकट झाल्यानंतर पश्चिम किनारपट्टीवर पावसासाठी पोषक वातावरण तयार होण्यासाठी जून महिन्याच्या मध्यापर्यंत वाट पाहावी लागणार आहे. पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर पूर्वेकडील चक्राकार वारे विकसित होण्यासाठी जून महिन्याच्या १० ते १५ तारखेचा कालावधी जाणार आहे. त्यानंतर आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रावर वरुणराजाची कृपा होईल. १७ ते २० जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्रात स्थिरावलेला असेल. येत्या सात दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा यलो अलर्ट असू शकतो तर ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा धोका आहे.पाऊस नेमका मान्सूनचा आहे की अवकाळी हे वेधशाळेला कळेना. दुसरीकडे कावळ्याने घरटे बांधण्यासाठी पाऊस कोसळला. कारण कावळा किती उंचीवर घरटे बांधतो त्यावरून पावसाचा अंदाज बांधला जातो. या वर्षीच्या पावसाने वेधशाळेपासून ते कावळ्यापर्यंत सगळ्यांचेच अंदाज चुकवलेले आहेत. कारण वेधशाळेतील मंडळी सातत्याने बदलणाऱ्या हवामानाचा अभ्यास करत असतात, अंदाज घेत असतात. शेतकऱ्यांमते पाऊस इतका लवकर येणार होता तर आधुनिक यंत्रणा सज्ज करून बसलेल्या वेधशाळेतील तज्ज्ञांना हे का कळू शकले नाही. कारण एव्हाना दरवर्षी मान्सून राज्यात दाखल झालेला असतो. ७ जून ही त्याची दरवर्षीची तारीख असते मात्र यंदा पावसाळा वेळेआधीच म्हणजेच मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातच दाखल झाला. त्याच्या वेळेआधी येण्याला पर्यावरण आणि हवामान बदलास कारण ठरवण्यात आले. वेळेआधी आलेला पाऊस बेमोसमी होता की खरंच सक्रीय मान्सूनचा होता याविषयी गोंधळाचे वातावरण होते. वेळेआधी मे महिन्यात जोरदार बरसलेल्या मान्सूनने ऐन जूनमध्ये थोडी विश्रांती घेतली आहे. हवामान खात्याने माहिती दिल्यानुसार १२ जूननंतर मान्सून खऱ्या अर्थाने सक्रीय होणार आहे. महाराष्ट्रातील ऋतुचक्र एक ते दीड महिन्याने पुढे गेल्याचा अनुभव आणि चर्चाही जुनी झाली आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात येणारा पाऊस आता एखाद महिना उशिराने दाखल होणार असल्यामुळे पाणीपुरवठा, सिंचन, शेती इतर पावसावर आधारित सर्वच घटकांचे नियोजनही दरवर्षी उशिरानेच होते यंदा मात्र वेळेआधी मुसळधार कोसळलेल्या पावसाने शहर आणि ग्रामीण भागातील शेती, जलसिंचनाचे नियोजनही बिघडवून टाकले आहे. महाराष्ट्रातील अनेक जलविद्युत प्रकल्प पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मान्सून उशिराने सक्रीय झाल्यास विजेचा तुटवडा होऊ शकतो आणि त्याचा परिणाम मुख्यत: शेतीवर होणार असून यंदा लोडशेडींग वाढण्याची चिन्हे आहेत.



# नेत्रदान-श्रेष्ठदान..!

**हॅलो प्रभात**

**नेत्र ही राष्ट्रीय संपत्ती आहे. दरवर्षी १० जून हा जागतिक दृष्टिदान दिन म्हणून जागतिक पातळीवर पाळला जातो. परंतु तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर हा नेत्रदान पंधरवडा म्हणून पाळण्यात यावा असे सूचित केले होते. तेव्हापासून दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर हा कालावधी राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा म्हणून पाळला जातो. या दिनानिमित्त नेत्रदान करायचे असल्यास नेत्रदानासंदर्भात काय काळजी घ्यावी महत्त्वाच्या मुद्यांवर टाकलेला हा प्रकाश...**

भारतात अंधत्व निवारणासाठी स्वतंत्र राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम सन १९७६ पासून राबविण्यात येत आहे. अंधत्वाची समस्या दूर करण्यासाठी दृष्टी २०२० हे विशेष अभियान राबविण्यात आले होते आणि २०२० पर्यंत देशातील अंधत्वाचे प्रमाण हे ०.३ टक्के इतके खाली आणण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले होते.

आज जगातील दृष्टीहिनांची संख्या पाच कोटींच्या जवळपास असून त्यापैकी भारतात जवळपास १ कोटी ५० लाखावर दृष्टीहीन आहेत. यापैकी ४६ लाख हे कॉर्नियामुळे दृष्टी गमावलेले आहेत. भारतात दरवर्षी जवळपास अडीच लाखापेक्षा अधिक नेत्रपटलांची (कॉर्नियाची) आवश्यकता आहे. त्या तुलनेत सध्या केवळ ४६ हजार नेत्रपटले नेत्रदानाद्वारे उपलब्ध होतात. देशात ४०२ नोंदणीकृत नेत्रपेढ्या असल्या तरी त्यातील फक्त १२० नेत्रपेढ्या कार्यरत असून त्यापैकी ५६ नेत्रपेढ्या महाराष्ट्रात आहेत. भारतात दरवर्षी एक कोटीच्या जवळपास लोक या - ना- त्या कारणाने मृत्युमुखी पडतात. परंतु त्यापैकी केवळ १.५ टक्के लोक नेत्रदान करतात. श्रीलंका या आपल्या शेजारी देशात हेच प्रमाण शंभर टक्के आहे. नेत्र हे राष्ट्रीय संपत्ती या दृष्टीने बघण्याची मानसिकता येथील लोकांनी स्वीकारल्यामुळे तसेच त्या देशाने नेत्रदानासाठी कायदा केल्यामुळे ते स्वत: च्या देशाची नेत्रपटलांची गरज भागवून भारतासह इतर ६६ देशांना नेत्रपटले (कॉर्निया) पुरवित आहेत. जनजागृतीमुळे युरोप देशामध्येही नेत्रदानाबाबत ही धारणा स्वीकारण्यात आली. त्यासाठी ७-८ देश मिळून खास ऑरिबिस नावाचे विमान तयार करण्यात आले आहे. ते संबधित देशात रोज जाऊन कॉर्निया प्रत्यारोपणाची नि:शुल्क शस्त्रक्रिया करीत असते.

नेत्रदान म्हणजे आपले डोळे गरजू दृष्टीहीन व्यक्तींना आपल्या मृत्यूनंतर दान देणे होय. या दान दिलेल्या दात्यांच्या डोळ्यांच्या केवळ बुबुळांचे प्रत्यारोपण केले जाते. पूर्ण नेत्रगोलाचे होत नाही म्हणून त्याला नेत्ररोपण न म्हणता 'बुबुळ रोपण' असेही म्हटले जाते. नेत्रदानासाठी स्त्री-पुरुष, वंश, जाती, धर्म आणि वय हा भेद मानलाजात नाही. कोणत्याच धर्म-पंथाने या पुण्य कर्माला निषिद्ध मानले नाही. अगदी एक महिन्याच्या बालकापासून तर ९० वर्ष वयाच्या वृद्धदेखील नेत्रदान करून शकतो. मोतीबिंदू काढलेल्या व्यक्तीचे डोळेदेखील नेत्रदानासाठी उपयोगात येऊ शकतात. दृष्टीदोष घालविण्यासाठी चष्मा लावणारी व्यक्ती ही देखील नेत्रदान करु शकते. पुढील दोष किंवा आजार असल्यास त्यांचे डोळे नेत्ररोपणासाठी उपयोगी पडत नाही. विषबाधेमुळे किंवा पाण्यात बुडून आलेल्या मृत्यूनंतर तसेच धनुर्वात, रेबिजइन्फेक्टिव्ह, हिपॅटायटिस, इनकॅप्लायटीस, एड्स, डोळ्यांचा कर्करोगी व एड्सग्रस्त नेत्रदान करु शकत नाही. याशिवाय मधुमेह, कुष्ठरोग, ट्युबरकोलीस, सेप्टीसिनिया, सिकोरीस इत्यादी व्याधीमुळे डोळ्यावर परिणाम झालेल्या मृत व्यक्तींचा कॉर्निया प्रत्यारोपणासाठी उपयुक्त ठरत नाही. कुणालाही जिवंतपणी नेत्रदान करता येत नाही.

पारदर्शक असणारे डोळ्याचे बुबुळ जीवनसत्व 'अ'च्या अभावाने, डोळ्या येण्यामुळे, डोळ्यांना इजा झाल्यामुळे तसेच अन्य आजाराने अपारदर्शक झालेले बुबुळ पांढरे होऊन अंधत्व येते. आपल्या भारतात दरवर्षी वरील कारणास्तव व आजारामुळे २० लाख लोक आपली दृष्टी गमावीत असतात.

## १० जून : दृष्टिदान दिन

यावर उपाय म्हणजे अपारदर्शक बुबुळ काढून त्याऐवजी दात्याचे स्वच्छ व पारदर्शक पातळ बुबुळ प्रत्यारोपण करून आलेले अंधत्व दूर करणे होय. कॉर्निया रोपणाद्वारे दृष्टीदान मिळावे यासाठी प्रतिक्षा करणाऱ्यांचे देशातील संख्या ५० लाखाचे जवळपास असून यात २६ टक्के मुले आहेत. दृष्टीहिनांच्या संख्येत प्रतिवर्षी हजारोंची भर पडतच आहे. भारतात गुजरात, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात नेत्रदानासाठी समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे. ही समाधानाची बाब आहे. मानवसेवेचे हे महान पवित्र कार्य मृत्यूपूर्व नेत्रपेठीत इच्छापत्र भरुन संकल्पाद्वारे करता येते. मृत्यूनंतरही या जगात नेत्ररूपाने आपले अस्तित्त्व असल्याचा आनंद तसेच मानव कल्याणासाठी आपले नेत्र राष्ट्रार्पण केल्याचे समाधान अंत्यक्षणी मिळावे यासाठी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करा आणि दृष्टीहिनांना प्रकाश देण्यासाठी पुढे या. मरणोत्तर नेत्रदानाचे ठराविक नमुन्यातील इच्छापत्र आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या समक्ष भरून दिल्यानंतर दात्यास एक डोनर कार्ड दिले जाते. पत्नी, मुले, मुली आणि परिवारातील सर्वांना याची कल्पना द्यावी. नेत्रदात्यास जेव्हा मृत्यू येईल. तेव्हा अविलंब नेत्रपिढीशी संबंध साधणे गरजेचे असून त्यासाठी १९१९ हा दूरध्वनी क्रमांक देशभरातील सर्व नेत्रपेढ्यांना देण्यात आला आहे. डॉक्टर येण्यापूर्वी मृत्यूचे प्रमाणपत्र उपलब्ध करून घ्यावेत. मृतदेह ज्या ठिकाणी असेल तेथील पंखे बंद करावे. खोलीत ए. सी. असेल तर सुरू ठेवावा. जेणेकरून मृतकाचे डोळे कोरडे पडणार नाहीत याचीही काळजी घ्यावी. शक्य झाल्यास नेत्रदात्यांच्या डोळ्यात अँटीबायोटिक्स ड्रॉप्स टाकून डोळे उघडे असल्यास बंद करावे. डोक्याखाली उशी ठेवावी. डोळ्याचे बुबुळ उन्हाळ्यात दोन ते चार तासांपूर्वी आणि हिवाळ्यात चार ते सहा तासांपूर्वी काढणे आवश्यक असते. तसेच डोळ्यांना थंड पाण्याने थंड ठेवणे आवश्यक असते.

नेत्रदानासह देहदान करणे हे मानवतावादी महान कार्य आहे. नेत्रदान केल्यामुळे नेत्रदात्यांच्या चेहऱ्यावर कुठल्याही प्रकारची विद्रुपता येत नाही. डोळ्यातून रक्तस्त्राव होणार नाही, याची पूर्णत: दक्षता घेतली जाते. अंत्यविधीच्या कार्यवाहीसाठी कसलाही विलंब होत नाही. आपले मरणोत्तर नेत्रदान दोन दृष्टिविहीन व्यक्तीच्या जीवनात प्रकाश आणू शकतात. अशा या अत्यंत महान मानवतावादी आणि पवित्र कार्यासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून समाजसेवी संस्थांनी, चिंतनशील व्यक्तिंनी तसेच शिक्षकांनी याबाबत समाजात प्रबोधन करून लोकांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे.




### नेत्रदान-श्रेष्ठदान !

एक वर्ष वय असलेली कोणतीही व्यक्ती आपले नेत्रदान करु शकते. जिवंत असताना आपले डोळे दान करण्यासाठी इच्छापत्र लिहून दिल्यास मृत्यूनंतर अशा व्यक्तीचे डोळे दान होऊ शकतात. एखाद्या व्यक्तिने नेत्रदानासाठी इच्छापत्र लिहून दिले असल्यास त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांनी त्याच्या इच्छेचा आदर ठेऊन कार्यवाही करायला हवी. मोतिबिंदू शस्त्रक्रिया, मधुमेह, उच्च मानसिक त्रास आणि चष्मा वापरत असणारे व्यक्तीही नेत्रदान करु शकतात.

नेत्रदान करायचे इच्छापत्र लिहून दिल्यावर मृत्यूनंतर नातेवाईकांनी शक्य तितक्या लवकर म्हणजे मृत्यूनंतर जास्तीत जास्त ६ तासामध्ये मृत व्यक्तीचे डोळे नेत्र बॅंकेत जमा होतील, असे पहावे. त्या व्यक्तिच्या मृत्यूनंतर नेत्र बॅंकेत दूरध्वनी करुन खालील बाबींची पूर्तता करायला हवी.

1. **मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे दोन्ही डोळे झाकून त्यावर कापसाचा बोळा ठेवावा.**
2. **पंखा चालू असल्यास तो बंद करावा.**
3. **शक्य असल्यास अधूनमधून सूक्ष्म जंतू नाशकाचे थेंब मृत पावलेल्या व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये टाकावे. त्यामुळे संसर्ग होण्याचा धोका कमी होतो.**
4. **मृत पावलेल्या व्यक्तीचे डोके अंदाजे ६ इंच वर उचलून ठेवावे. असे केल्याने डोळे काढताना रक्तस्त्राव टाळता येईल.**

अचानक मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे डोळे दान होऊ शकत नाही तसेच रॅबिज, सिफील्स, सांसर्गिक काविळ, सेप्टीसेमिया आणि एड्स अशासारख्या रोगाने बाधित असणाऱ्याना आपले डोळे दान करता येत नाही.

नेत्ररोपण करताना संपूर्ण डोळ्याचे रोपण होत नसून फक्त डोळ्यांच्या बाहुलीच्या पडद्याचे रोपण होते आणि उर्वरित भागाचा वापर शैक्षणिक आणि संशोधनासाठी केला जातो.

मृत व्यक्तीचे डोळे काढून घेणे ही क्रिया फक्त ३० मिनिटांची असून डोळे काढल्यानंतर कोणतीही खूण दिसत नाही. नेत्रदान हे दुसऱ्यासाठी जीवन दानासारखे आहे. जिवंतपणी कोणालाही कायद्यानुसार नेत्रदान करता येत नाही तसेच ज्या व्यक्तीला डोळ्याचे रोपण करण्यात आले आहे त्या व्यक्तीलाही कोणाचे डोळे मिळाले आहेत, हेही सांगितले जात नाही.

नेत्र बॅंक ही मानवतेच्या भावनेने प्रेरीत होऊन नेत्रदान केलेल्या व्यक्तीचे डोळे जमा करुन त्या डोळ्यांना विकसित करते आणि ज्या व्यक्तींना डोळ्यांची आवश्यकता आहे त्यांना त्या डोळ्यांचे वाटप करते. नेत्र रोपण करताना संपूर्ण डोळ्याचे रोपण होत नसून फक्त डोळ्यांच्या बाहुलीच्या पडद्याचे रोपण होते आणि उर्वरित भागाचा वापर शैक्षणिक आणि संशोधनासाठी केला जातो. दान करण्यात आलेल्या परंतु बाहुलीच्या पडद्याच्या रोपणासाठी पात्र नसलेल्या डोळ्यांना महत्वाच्या संशोधन कामासाठी वापरले जाते. बाहुलीच्या पडद्याच्या रोपणामध्ये ९ ० टक्क्याहून जास्त शस्त्रक्रिया यशस्वी होत असून बाहुलीच्या पडद्याच्या समस्येने ग्रस्त असणाऱ्या व्यक्तीना या रोपण शस्त्रक्रियेद्वारे पुन्हा दृष्टी मिळते. नुकत्याच जन्मलेल्या आणि अस्पष्ट बाहुलीचा पडदा असणाऱ्या बालकांना बाहुलीच्या पडद्याचे रोपण ही एक देणगीच आहे.

बाहुलीच्या पडद्याचे रोपण ही एक शस्त्रक्रिया असून त्या शस्त्रक्रियेद्वारे अस्पष्ट बाहुलीच्या पडद्याऐवजी दान केलेल्या व्यक्तीच्या डोळ्यातील सुस्पष्ट बाहुलीचा पडदा बसविण्यात येतो. बाहुलीच्या पडदा हा खालील कारणाने अस्पष्ट होतो.

**१. संसर्ग २. इजा**
**३. डोळ्याची शस्त्रक्रिया झाल्यानंतर व्यवस्थित काळजी न घेणे,**
**४. कुपोषण आणि ५. अनुवंशिकता.**

भारतामध्ये जगाच्या एक चतुर्थांश व्यक्ती दृष्टीहीन आहेत. साधारण दृष्टीदोषाने २७ दशलक्ष व्यक्ती ग्रासित आहे. दोन्ही डोळ्यांच्या अंधत्व ९ दशलक्ष लोकांना असून ३ दशलक्ष अंध बालके आहेत. बाहुलीचा पडदा खराब असणाऱ्या अंध व्यक्तीची संख्या ४.६० दशलक्ष असून बाहुलीच्या पडदा रोपणामुळे जवळपास ३ दशलक्ष लोकांना लाभ झाला आहे.

# एक प्रभावशाली आणि अभ्यासू मंत्री : चंद्रकांतदादा पाटील

**हॅलो प्रभात**

**मा. चंद्रकांतदादा पाटील यांचा आज वाढदिवस. यानिमित्ताने त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..! भारतीय जनता पक्षाच्या कामातून चंद्रकांतदादांना गेली वीस वर्ष मी जवळून बघत आलो आहे. १९७८ सालात चंद्रकांत दादांचा विद्यार्थी परिषदेचे संस्थापक श्री. यशवंतराव केळकर यांच्याशी संपर्क आला आणि तेव्हापासून ते विद्यार्थी परिषदेच्या कामात सक्रिय झाले.**

१९८० ते १९९० अशी दहा वर्ष, विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून त्यांनी काम केले. १९८० ते १९८३ तीन वर्ष त्यांनी जळगाव जिल्हा प्रचारक म्हणून काम पाहिले. त्यानंतर अभाविप चे महाराष्ट्र संघटन मंत्री, क्षेत्रीय संघटन मंत्री आणि अखिल भारतीय महामंत्री म्हणून त्यांनी काम केले. या दरम्यान संपूर्ण देशभर प्रवास करून त्यांनी विद्यार्थी परिषदेच्या कामाला आपल्या उत्तम संघटन कौशल्याच्या जोरावर मोठ्या प्रमाणावर विस्तारित केले.

या काळातच केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शहा यांच्यासह संपूर्ण भारतातील भाजप आणि संघ परिवारातील अत्यंत मान्यवर लोकांचा त्यांच्याशी जवळून संपर्क आला. डिफेक्स प्रदर्शन, कृषी शिक्षण, तंत्र शिक्षण असे नवीन कार्यक्रम चंद्रकांतदादांनी त्यांच्या काळात विद्यार्थी परिषदेच्या कामात तयार केले. केवळ महाविद्यालयीन निवडणुका नव्हे तर कॉलेज कॅम्पसमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमात विद्यार्थी परिषदेचा सक्रिय सहभाग असण्यावर त्यांनी भर दिला आणि यातूनच कॅम्पस कल्चर हा एक नवीन कार्यक्रम त्यांनी विद्यार्थी परिषदेला दिला. विद्यार्थी परिषदेच्या पूर्णवेळ कामातून थांबल्यानंतर त्यांनी आपल्या मूळ गावी गारगोटी येथे स्थायिक होऊन उदरनिर्वाहासाठी काही काळ शेती केली आणि काजू प्रक्रिया उद्योग चालू केला. ९५ ते ९९ सालात, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामात ते सक्रिय होते. त्यावेळी त्यांनी कोल्हापूर जिल्हा विभाग संघ कार्यवाह म्हणून काम केले.



विद्यार्थी परिषदेतील त्यांचे संघटन कौशल्य लक्षात घेऊन, कै. प्रमोद महाजन, कै. गोपीनाथ मुंडे आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सांगण्यावरून २००४ सालापासून पूर्णवेळ भारतीय जनता पक्षाचे काम करण्यास त्यांनी सुरुवात केली. २००४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस म्हणून त्यांनी कामास सुरुवात केली. २००९ आणि २०१४ या दोन निवडणुकीत पुणे पदवीधर मतदार संघातून ते मोठ्या मताधिक्याने आमदार म्हणून विधानपरिषदेवर निवडून गेले. विधानपरिषदेत सुद्धा त्यांनी पदवीधरांसाठी केलेली विविध कामे लक्षणीय ठरली.

२०१९ आणि २०२४ या निवडणुकांमध्ये पुण्यातील कोथरूड मतदारसंघातून ते विधानसभेवर आमदार म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आले. १४ ते १९ या देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळामध्ये त्यांनी सहकार, पणन आणि सार्वजनिक बांधकाम या विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिले.

२०१९ ते २०२२ या काळात भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. सध्याच्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आहे. त्याचबरोबरीने सांगलीचे पालकमंत्री म्हणून ते सध्या कार्यरत आहेत. सांगलीचे पालकमंत्री म्हणून काम चालू केल्यावर त्यांनी सांगली जिल्हा 'नशा मुक्त' होण्याच्या दृष्टीने प्रभावी काम चालू केले आहे. प्रत्येक आठवडा दौऱ्यामध्ये, अमली पदार्थविरोधी मोहिमेचा ते आढावा घेतात. सर्व प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेच्या समन्वय्याने कायद्याचा धाक आणि जनजागृतीच्या माध्यमातून या मोहिमेला चांगल्यापैकी यश मिळालेले आहे. याशिवाय आणखी विविध विषयांवर पालक मंत्री म्हणून त्यांचे प्रभावी काम चालू आहे.

अत्यंत धार्मिक, कुटुंबवत्सल, मितभाषी पण कामाच्या बाबतीत अत्यंत काटेकोर असणारे चंद्रकांतदादा प्रत्येक कामाची पूर्ण माहिती घेऊन, समोरच्याचे पूर्ण ऐकून आपले मत व्यक्त करत असतात त्यामुळे प्रशासनातले अधिकारी असो किंवा पक्ष संघटनेतले कार्यकर्ते.. यांच्याशी त्यांचा चांगला आणि वैयक्तिक संपर्क आहे. प्रचंड जनसंपर्क आणि प्रत्येकाशी मैत्री जोपासणे ही त्यांची सामाजिक आणि राजकीय कार्यातील बलस्थाने आहेत.

कोथरूड विधानसभा क्षेत्रात सुद्धा त्यांनी त्यांच्या विविध सामाजिक आणि सार्वजनिक कामातून आपला एक वेगळा ठसा निर्माण केलेला आहे. आज वयाच्या ६६ व्या वर्षी देखील ते अत्यंत उत्साहाने अखंड कार्यरत आहेत, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. चांगले काम करणाऱ्या प्रत्येक प्रशासकीय अधिकाऱ्याला त्याच्या कामाची पावती म्हणून आवर्जून कॅडबरी बक्षीस देणारे हे एकमेव पालकमंत्री. त्यांना वाढदिवसाच्या पुनश्च शुभेच्छा..!

**• केदार खाडिलकर**
(प्रसिद्धीप्रमुख व माध्यम संयोजक भाजप सांगली जिल्हा)

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टॅंड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टॅंड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत) ■ **Email : ehelloprabhat@gmail.com**
■ सह संपादक : सार्थक पाटील ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# डी. वाय. पाटील ‘कृषी’कडून पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**तळसंदे : हॅलो प्रभात**

डॉ.डी.वाय.पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रामीण कृषी कार्यानुभव अभियानाअंतर्गत महाविद्यालयाचे कृषीदूत आणि कृषीकन्या यांनी वाळवा व मिरज तालुक्यातील एकूण ११ गावामध्ये वृक्षारोपण करून तेथील शेतकरी व ग्रामस्थ यांच्यासाठी पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम घेतले.



कृषी महाविद्यालयाच्या परिसरात प्रा. डी. एन. शेलार यांच्याहस्ते वृक्षारोपण केले त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शेलार म्हणाले, पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जवाबदारी या पृथ्वी वरच्या प्रत्येक व्यक्तीची आहे. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्यांचे संगोपन केले पाहिजे. सर्वांनी पर्यावरण रक्षणासाठी जर सकारात्मक पाऊल उचलले तर नक्कीच भविष्यात आपल्याला बदल पाहायला मिळेल.

पर्यावरण सप्ताहानिमित्त वाळवा तालुक्यातील शिगांव, बागणी, गोटखिंडी, बावची, कारंदवाडी, मिरजवडी तसेच मिरज तालुक्यातील तुंग, समडोळी, कवठेपिरान व दूधगाव आदी गावात कार्यरत असलेल्या कृषीदूत व कृषीकन्यानी २५० पेक्षा जास्त वनवृक्ष लावले. या सर्व रोपांचे ग्रामस्थांनी संवर्धन करावे, असे आवाहन त्यानी केले. महाविद्यालयातील कार्यक्रमाचे आयोजन प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांनी केले होते त्यावेळी त्यांनी पर्यावरण दिनानिमित विविध कविता व पोस्टर्सचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाला अकॅडमिक प्रमुख प्रा. आर. आर. पाटील, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# बापूजींनी विद्यार्थी घडविण्यावर महत्त्वपूर्ण ‘योगदान’ दिले : मंत्री प्रकाश आबीटकर

### शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे जयंती साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी बापूजींच्या कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहन केले.यज्ञात बापूजींनी अव्याहतपणे शिक्षण क्षेत्रात कार्य केले. प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट विद्यार्थ्याला घडविणे हेच असावे. अध्यापनात चिंतन, मनन आणि मनाची घुसळण गरजेची असल्याचे विचार यावेळी मांडण्यात आले. बापूजींच्या विचारांचा वारसा घेऊन शिक्षकांनी कार्य करावे, असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख संस्थेचे सीईओ मा. कौस्तुभ गावडे यांनी करून दिली. ते म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षकाला ज्ञगुरुदेव कार्यकर्तेफ संबोधून समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. मुल्याधिष्ठित व विद्यार्थीभिमुख शिक्षणावर त्यांचा भर होता. ना. प्रकाश आबिटकर यांनी शिक्षण व राजकारणात मातीशी नाळ ठेवून साधेपणाने समाजसेवा केल्याचा गौरव करण्यात आला. आधुनिक शिक्षणासाठी एआय व रोबोटिक्स शिक्षण प्रसाराचे अभियान लवकरच राबवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते प्रकाश आबिटकर यांचा सत्कार करण्यात आला.सिरपचे अधिकारी रोहित शिंदे आणि अतिरिक्त आयुक्त संजय गुरव यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. प्रारंभी मान्यवरांनी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व भक्तीगीते सादर केली.

या कार्यक्रमाला संस्थेच्या सेक्रेटरी मा. प्रा. शुभांगी गावडे, सहसचिव डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर जिल्हा विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.आभार एस.एम.गवळी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. कविता तिवडे आणि प्रा.गीतांजली साळुंखे यांनी केले.

# पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दक्ष राहून काम करावे : विवेक कोल्हे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टीच्या कोपरगाव तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) पदावर सुनील कदम यांची निवड झाल्याबद्दल कोपरगाव आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभ राघवेश्वर मंदिर, कुंभारी येथे उत्साहात पार पडला. कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा अत्यंत पार पडला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.या प्रसंगी सुनील कदम यांचा सन्मान करण्यात आला आणि पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सोहळ्याला नागरिकांचा व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरदनाना थोरात, कोल्हे कारखाना व्हा . चेअरमन राजेंद्र कोळपे, बाजार समिती सभापती साहेबराव रोहोम, औद्योगिक वसाहत उपाध्यक्ष केशवराव भवर,माजी सभापती पं.स. मच्छिंद्र केकाण, विलासराव वाबळे, सोपानराव पाणगव्हाने, ज्ञानेश्वर होन, कैलास माळी, रमेश घोडेराव, संभाजीराव गावंड, रघुनाथ फटांगरे, फकिरराव बोरणारे, दीपकराव चौधरी, दगूराव चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल गवळी, मा.सरपंच बाळासाहेब पाणगव्हाने, मा.सभापती सुनीलराव देवकर, मा.तालुकाध्यक्ष युवा मोर्चा विक्रम पाचोरे, राजेंद्र गवळी, डी.पी. मोरे, निवृत्ती बनकर, शिवाजीराव जाधव, संदीपराव देवकर, शिवाजीराव कदम, विजयराव कदम, किरण कोळपे, बापूसाहेब पवार, शब्बीर पटेल, पुंजाजी राऊत आदीसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


यावेळी बोलताना कोल्हे म्हणाले, चांगले काम करणाऱ्याला न्याय देण्यात यावा अशी भूमिका बिपीन कोल्हे आणि मा.आ. स्नेहलता कोल्हे यांच्यासह आम्हा सर्वांची आहे. पक्ष वाढीसाठी आपण पूर्ण ताकदीनिशी काम करतो आहोत. पक्षहितासाठी आपण गत निवडणुकीत भूमिका घेतली पण दुर्दैवाने जे यश आपण लोकप्रतिनिधींच्या पदरात टाकले त्याप्रमाणे अपेक्षित काम होताना दिसत नाही हे वास्तव आहे यामुळे नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न सोडवण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून आपले काम सुरू आहे. या कार्यक्रमाने कोपरगाव मतदारसंघातील एकात्मता, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि पक्षवाढीचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. भारतीय जनता पक्षाचे ध्येय धोरण पुढे घेऊन जात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम कायम कोल्हे कुटुंब करत आले आहे.

जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष आहे त्याचे अध्यक्ष म्हणून मतदारसंघात पक्ष वाढीसाठी कदम यांनी जोमाने काम करावे अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# ट्रेडबायनरीने वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत एकाच दिवशी लावली २०,००० रोपे

**मुंबई : हॅलो प्रभात**

कार्बन न्यूट्रॅलिटीसाठी भारताच्या कटिबद्धतेला गती देण्याच्या दिशेने धाडसी पाऊल उचलत ट्रेडबायनरी या आघाडीच्या तंत्रज्ञान व सल्लागार कंपनीने मोठ्या वृक्षारोपण मोहिमेचे नेतृत्व करत जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. या मोहिमेअंतर्गत एकाच दिवशी २०,००० रोपे लावण्यात आली. हा उपक्रम भारतीय नौदल, ठाणे महानगरपालिका आणि वन विभागासोबत सहयोगाने राबवण्यात आला. यासह ट्रेडबायनरीचा विश्वास दृढ झाला की तंत्रज्ञान व शाश्वतता एकत्र येऊन स्थिर, रिजनेटिव्ह भारत घडवता येऊ शकतो.




भारतीय नौदलाने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर आयोजित करण्यात आलेल्या या इव्हेण्टमध्ये ८० हून अधिक नौदल अधिकारी व त्यांचे कुटुंबिय वृक्षारोपण करण्यासाठी आणि पर्यावरणीय संतुलनाचे संवर्धन करण्यासाठी एकत्र आले. कमांडर अमोद यादव यांच्यासोबत ट्रेडबायनरीचे संस्थापक व संचालक आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे-क्रीक्साइडचे अध्यक्ष युवराज शिधये यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले, तसेच वातावरणाप्रती जागरूक विकासाच्या दिशेने धोरणात्मक पुढाकाराला गती दिली.

# पिचकाऱ्या मारणाऱ्यांना मंदिरात प्रवेशबंदी

**तुळजापूर : हॅलो प्रभात**

येथील श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात पान, तंबाखू, गुटखा खाऊन मंदिरात प्रवेश करणाऱ्या कर्मचारी, पुजारी, सेवेकरी यांना भविष्यात मंदिर प्रवेशबंदी करण्यात येईल, असा सज्जड इशारा मंदिराचे विश्वस्त तथा तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी एका आदेशाद्वारे नुकताच दिला आहे. सध्या मंदिरात देवी दर्शनाला जाणाऱ्या भाविकांकडून विडी, सिगारेट, तंबाखू, गुटखा मंदिराच्या प्रवेशद्वारावरच काढून घेतल्यानंतर त्यांना मंदिरात प्रवेश दिला जातो. मात्र हा नियम मंदिर कर्मचारी, सेवेकरी, पुजारी यांनाही लागू करण्यात यावा, अशा सूचना विविध ठिकाणच्या भाविकांनी संस्थांनकडे केल्या होत्या, त्याची गंभीर दखल घेवून मंदिर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

# ‘आषाढी’निमित्त ५५ लालपरी धावणार

**सांगली : हॅलो प्रभात**

आषाढीनिमित्त सांगलीतून ५५ तर कोल्हापुरातून ६५ जादा लालपरी धावणार आहेत. तब्बल



चार वर्षांनी एसटीने नवीन २६४० लालपरी बसेस घेतल्या. त्यापैकी ३१ विभागात मिळून तब्बल १५०० एसटीच्या ताफ्यात दाखल झालेल्या आहेत. ही माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# ‘शरद’च्या ११ विद्यार्थ्यांची ‘टेक महिंद्रा’त निवड

**यड्राव : हॅलो प्रभात**

येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या ११ विद्यार्थ्यांची टेक महिंद्रा या नामांकित कंपनीत निवड झाली. महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्प्युटर या विभागातील विद्यार्थ्यांची निवड झाली.

कॉम्प्युटर विभागातील हर्षल बिचकर, यश चव्हाण, शिवम पिसाळ, सुखांकर हनमिनाहाल, शार्दुल कुलकर्णी, प्रथमेश चव्हाण, चिराग कारंडे, ऋतुजा काळे, सम्मेद सामंत, रुनमयी जांबरे इलेक्ट्रॉन्कसमधील सुयश पांडे या विद्यार्थ्यांची निवड झाली.

ही महिंद्रा समूहाचा एक भाग आहे आणि आयटी सेवा, सल्लागार, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, कन्सल्टिंग आणि बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंगसह विस्तृत सेवा देणारी एक भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी आहे. यामध्ये एआय, क्लाउड, अभियांत्रिकी, व्यवसाय प्रक्रिया सेवा आणि दूरसंचार उपाय




यांचा समावेश आहे. पुण्यात मुख्यालय असून जगभरातील ९० देशापेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत आहे.

महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांसाठी स्पेशल ॲप्टीट्युड ट्रेनिंग, टेक्निकल स्कीलचे वेगळे प्रशिक्षण तसेच मॉक इंटरव्ह्यु यासह टेक्निकल सेशन, व्हॅल्यू ॲडेड प्रोग्रॅम, कंपनी स्पेसीपीक ट्रेनिंग, अद्यावत तंत्रज्ञानाबाबत कंपनीतील व इंडस्ट्री क्षेत्रातील तंज्ञामार्फत मार्गदर्शन यासह विविध उपक्रम राबविले जातात. प्रोजेक्ट बेस लर्निंग अंतर्गत विद्यार्थ्यांना दुस-या वर्षापासूनच प्रोजेक्ट दिला जातो. तसेच तृतीय वर्षापासूनच ॲप्टीट्युड ट्रेनिंग, कोडींग लँग्वेज स्कील, माजी विद्यार्थांकडून मार्गदर्शन घेतले जाते. शेवटच्या वर्षी सहा महिने इंडस्ट्री इंटर्नशिप असते. या सर्वाचा उपयोग विद्यार्थ्यांना या कॅम्पससाठी झाला.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेलचे प्रा. नेहा प्रसून यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# संभाजी ब्रिगेडमुळे जातीय दंगली थांबल्या : शिवराज काटकर

**सांगली : हॅलो प्रभात**

पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी ३५ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये वेगवेगळ्या समाजातील प्रमुख मान्यवरांच्या भेटी घेऊन आपली भूमिका मांडली. त्यांच्या प्रयत्नाला अलीकडच्या काळामध्ये यश येत आहे.मराठा सवर्ण यांच्यातील जातीय दंगली थांबल्या. काही प्रमाणात हिंदू मुस्लिम जंगली ला पाय बंदी आली. संभाजी ब्रिगेड मुळे अनेक वक्ते लेखक निर्माण झाले, असे मत ज्येष्ठ पत्रकार शिवराज काटकर यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष युवराज शिंदे प्रास्ताविक करताना म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज किंवा इतर महापुरुषांना जातीयतेच्या चौकटीत न पाहता त्यांच्या विचाराचे आचरण होणे गरजेचे आहे. राजकीय लोक स्वार्थासाठी महापुरुषांचा वापर करत आहेत. हे सर्वसामान्यांनी ओळखून त्यांना त्याचा जाब विचारायला हवा. कुणाचीही उंची नाही की त्यांनी महापुरुषांवर काहीही बोलावं. त्यांना महापुरुषांच्या पायाच्या नखाची सर सुद्धा येणार नाही. स्पर्धा घेण्यामागचा एकच हेतू आहे हीच लहान मुलं उद्या देशाचे नागरिक, प्रशासक, राज्यकर्ते म्हणून समोर येणार आहेत. यांना खरा इतिहास माहीत असणे गरजेचे आहे. माजी सैनिकांनी तारुण्यमध्ये देशसेवेसाठी आपले आयुष्य वाहिलेले असते. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणे हे संभाजी ब्रिगेड कर्तव्य समजते, असे मत युवराज शिंदे यांनी मांडले.यावेळी गुणवत्त विद्यार्थी व माजी सैनिकांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राजेंद्रसिंह पाटील, अमृत सूर्यवंशी, डॉ. मोहन पाटील, अर्चना उबाळे,उज्वला पेडणेकर, डॉ. संजय पाटील, जालिंदर महाडिक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# झाडे देऊन वाढदिवस साजरा

**नातेपुते : हॅलो प्रभात**

आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा व्हावा, अशी अलंकापुरी येथील युवा उद्योजक आणि ईश्वर फौंडेशनचे अध्यक्ष ईश्वर काळे यांची मनोमन इच्छा होती व या इच्छेतूनच त्यांनी दहिगाव ग्रामपंचायतीला २०० झाडे देऊन आपला वाढदिवस साजरा केला. ईश्वर ट्रान्सपोर्टच्या माध्यमातून ते वेळोवेळी समाजउपयोगी उपक्रम घेतात. यावेळी लोकनियुक्त सरपंच सोनमताई खिलारे उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी ईश्वर काळे यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.आपण दिलेल्या झाडांचे योग्य पद्धतीने संगोपन करण्याची हमी दिली. यावेळी ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजयसिंह पाटील, संभाजीराजे फुले, सदस्य महादेव काळे, ग्रामपंचायत सदस्य धनाजी खुसपे, सामाजिक कार्यकर्ते भीमराव फुले, ईश्वर फाऊंडेशनचे उपाध्यक्ष शंकर वलेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रवारणा बुद्ध विहार मॉडेल विहार म्हणून अस्तित्वात येईल : आम. डॉ. विनय कोरे

**शिराळा : नारायण घोडे-पाटील**

तुरुकवाडीचे प्रवारणा बुद्ध विहार हे राज्यातील एक मॉडेल विहार म्हणून अल्पावधीतच अस्तित्वात येईल, असे गौरवोद्गार आमदार डॉ. विनय कोरे यांनी काढले. तुरुकवाडी( ता. शाहूवाडी) येथील प्रवारणा बुध्द विहार व अशोकस्तंभ लोकार्पण सोळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. विष्णूपंत बनसोडे हे होते. आ. कोरे बोलताना पुढे म्हणाले, तुरुकवाडीचे प्रवारणा बुध्द विहार परिसरातील जनतेला ऊर्जा देईल.



प्रास्ताविक आर.एस.पाटील यांनी केले. माजी बांधकाम व आरोग्य सभापती सर्जेराव पाटील, शामराव लोखंडे, डॉ. नितीन बनसोडे, करण कांबळे, अरुणकुमार पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी अशोक कुंभार, गणपती कांबळे, विठ्ठल बनसोडे, विलास बनसोडे, भालचंद्र लोखंडे, भीमराव बनसोडे, सुनिल बनसोडे, मेजर बाबजी बनसोडे, भगवान कांबळे, अतुल कांबळे, शहाजी कांबळे, प्रल्हाद लोखंडे, मधुकर कांबळे, संभाजी कांबळे, प्रकाश कांबळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विश्वास कोतोलीकर यांनी तर आभार शामराव लोखंडे यांनी केले. दरम्यान पहिल्या सत्रात सकाळी कोतोली ते तुरुकवाडीपर्यंत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. प्रवारणा विहारात विधीवत पूजन करुन भंते सिरी सारो यांच्या हस्ते बुध्दमुर्तीचे अनावरण व नामकरण करण्यात आले.

# नवागत विद्यार्थ्यांचे ‘न्यु मॉडेल स्कुल’मध्ये स्वागत

### शैक्षणिक वर्षाला उत्साही सुरुवात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळांमध्ये शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येत शाळेच्या उंबरठ्यावर प्रथमच पाऊल ठेवणाऱ्या बालगोपाळांना आनंदाने सामोरे गेले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल ताराबाई पार्क येथे विद्यार्थ्यांचे स्वागत फुलांच्या उधळणीनं आणि टाळ्यांच्या गजरात करण्यात आले. पालकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



स्वागतासाठी विद्यार्थ्यांना खास रंगिबेरंगी फुले..फुलांची कमान..पुष्प गुच्छ देऊन गौरविण्यात आले. गाणी, कवितावाचन यामुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण होते. मुलांशी संवाद साधला व शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास रुजवावा असे आवाहन केले. येथे लहानग्यांना टॉफी, वही-पेन आणि स्वागतफलक देऊन खास सत्कार करण्यात आला. काही शाळांमध्ये ज्ञस्वागत रांगोळीफ्द्वारे परिसर सजविण्यात आला होता. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली या स्वागत उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांसाठी नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची स्वच्छता आणि शालेय वाहतुकीची दक्षता यावर विशेष लक्ष दिले. शिक्षकांनी नवागत विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संवाद साधत शाळा ही केवळ अभ्यासाची जागा नसून, आनंदाने शिकण्याचं केंद्र आहे हे त्यांना समजावले. सह संस्थेच्या प्राचार्य शुभांगी गावडे, सिईओ कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

दैनिक
# हॅलो प्रभात
■ सांगली ■ कोल्हापूर ■ मंगळवार, १० जून २०२५






# संभाव्य पूर परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी काकडे

**संभाव्य पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी प्रात्यक्षिक संपन्न**



**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्ह्यातील संभाव्य पूरस्थिती हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज असून, नागरिकांनी संभाव्य पूरपरिस्थितीत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. वेळोवेळी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात सहभागी होऊन पूरपरिस्थितीवर मात करण्याची माहिती घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे केले.

आयर्विन पूल सांगली येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) तसेच महानगरपालिका अग्निशमन दल यांनी संभाव्य पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण व प्रत्यक्ष पूर परिस्थितीमध्ये येणाऱ्या समस्या हाताळण्याचे प्रात्यक्षिक जिल्हाधिकारी अशोक काकडे व महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी यांच्या उपस्थितीत दाखवले. त्या प्रसंगी जिल्हाधिकारी अशोक काकडे बोलत होते.

यावेळी अतिरीक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उपायुक्त विजया यादव, अप्पर तहसीलदार अश्विनी वरुटे, मिरज तहसीलदार अपर्णा मोरे-धुमाळ, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ, सहाय्यक आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन नकुल जकाते, मालमत्ता अधीक्षक धनंजय हर्षद, मंडल अधिकारी, तलाठी, स्वच्छता निरीक्षक अतुल आठवले, धनंजय कांबळे, याकुब मद्रासी तसेच मनपा अधिकारी आणि महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## कृषीदुतांनी केला पर्यावरण दिवस साजरा

**वांगी : हॅलो प्रभात**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत, जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालय रेठरे बु. येथील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता, कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कडेगाव तालुक्यातील शिरगांव या गावामध्ये दाखल झाले आहेत. २४ आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची विविध प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना दाखवली जाणार आहेत. कृषिदूत यांनी ग्रामपंचायत शिरगांव येथे भेट दिली असता भेटीदरम्यान ग्रामपंचायतीचे सरपंच प्रदिप शेवाळे, वसंतराव तोडकर, विजय माने, शिंदे सर आणि गावातील शेतकरीवर्ग यांनी त्यांचे स्वागत केले. त्याचप्रमाणे ५ जून रोजी पर्यावरण दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. त्याप्रसंगी वेगवेगळ्या फळाफुलांची झाडे लावून गावाच्या निसर्गाची शोभा वाढवली.

वांगी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रत्यक्षिकावर आधारित उपक्रम राबवला जातो. यादरम्यान विद्यार्थी प्रत्यक्ष गावांमध्ये वास्तव्य करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, शेतकयांचे जीवनमान, त्यांचा सामाजिक आर्थिक स्तर संबंधित गावातील पीक पद्धती अशा विविध गोष्टीचा अभ्यास करणार आहेत. सध्या प्रत्येकाकडे स्मार्ट फोन व इंटरनेट सुविधा आहेत. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती, आधारित उद्योग व्यवसाय व इतर हवामान विषयी जास्तीत जास्त माहिती विविध अँपद्वारे कशी संपादित करता येईल याबाबत विद्यार्थी मार्गदर्शन करणार आहेत. कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमामध्ये शेवट्च्या ४ आठवड्यात कृषीदूत कृषी आधारित उद्योगांमध्ये प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेतील, शेतकयांना होणारा फायदा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक फरांदे कार्यक्रम समन्वयक प्रा.दीपक भिलवडे,कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण पाटील, प्रा. अमोल आडके व इतर विशेषतज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यांच्या मार्गदर्शनाखाली जयेश चव्हाण, विघ्नेश देशमुख, अभिजीत खोत, यश कारंडे, स्वराज गायकवाड, निखिल खोत, भूषण थोरात हे कृषीदूत या अभियानात सहभागी झाले आहेत.

## पाण्यापासून वंचित असणाऱ्या शेतीचे क्षेत्र आले पाण्याखाली; सांगली, कोल्हापूर जिल्ह्याचा वनवास संपला : रणधीर नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

चांदोली धरणामुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पाण्यापासून वंचित असणारे सर्व शेतीचे क्षेत्र पाण्याखाली आले असून दोन्ही जिल्ह्याला जो सर्वांच्याच नशिबी असणारा वनवास सहन करावा लागत होता. तो खऱ्या अर्थाने धरण पूर्ण झाल्यानंतर संपला, असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर



नाईक यांनी केले. मणदूर (ता. शिराळा) येथील ज्ञानदेव भाष्टे हे पाटबंदारे विभागातून ४० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवा निवृत्त झाले. ग्रामस्थांच्या वतीने घेतलेल्या त्यांचा सत्कार समारंभ प्रसंगी नाईक बोलत होते.

पुढे म्हणाले, चांदोली, मणदूर परिसरातील डोंगर कड्यकपारीमध्ये वसलेल्या अनेक गावातील नागरीकांच्या त्यागातून बलिदानतून चांदोली धरणाची निर्मिती होऊन सांगली व कोल्हापूर जिल्हा आज सुजलाम सुफलाम झाला आहे. या दोन्ही जिल्ह्यामध्ये फार मोठ्या बदल झाला असून वर्षानुवर्ष पाण्यापासून वंचित असणारी शेती पाण्याखाली आली. दुर्दैवाने या परिसरातील लोकांचे झालेले पुनर्वसन्न व दिलेले बलिदान लोकांना जाणवत नाही किंवा कदाचित तेवढी किंमत वाटत नाही.पुनर्वशीत लोकांना अनेक अडचणीला सामोरे जाऊन सामना करावा लागला. मनदुर गावचे जरी प्रत्यक्षात पुनर्वसन झाले नसले तरी या गावांचे फार मोठे धरणासाठी योगदान आहे. आपल्या गावचे जेवढे शिवार आपल्या सर्वांच्या नावावर आहे. त्याच्यापेक्षा जास्त आपल्या जमिनी धरणासाठी व कॅनॉलसाठी गेल्या तर शासनाच्या इतर कामासाठी संपादित झालेल्या आहेत. आपल्या भागामध्ये हा प्रकल्प मोठा झाला त्याचे समाधान आहे परंतु या प्रकल्पामुळे ज्या अडचणी निर्माण झाल्याच्या त्रुटी राहिल्या आहेत. या परिसरातील अनेक नागरिकांनी धरणाच्या कामासाठी अतिशय मेहनत, कष्ट व जिद्द ठेवून रोजंदारीवर काम करत आपला उदरनिर्वाह भागवण्याचे काम केले. आज ते टप्प्याटप्प्याने पाटबंधारे विभागातून सेवा निवृत्त होत आहेत. ज्ञानदेव भाष्टे यांनी ४० वर्षे आपली प्रदीर्घ सेवा करून नोकरीमध्ये वरिष्ठांची सलगी ठेवत कुठल्याही प्रकारचा आपल्या सेवेमध्ये डाग न लागत केलेले काम आदर्शवत आहे.

यावेळी सावळा पाटील, माजी सरपंच वसंत पाटील, सोसायटीचे चेअरमन जी के पाटील, मारुती पाटील, माजी सरपंच पांडुरंग पाटील, कोंडीबा पाटील, आनंदराव चौगले, अशोक पाटील, बबन पवार, शिवाजी भाष्टे, भगवान पाटील, विठ्ठल चौगले, राम पाटील व ग्रामस्थ मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## इचलकरंजीत शिवराज्याभिषेकदिन उत्साहात

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

अखंड हिंदुस्थानचे मानबिंदू, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना शिवराज्याभिषेकदिनाचे औचित्य साधत येथील महापालिकेसह शहर



परिसरातून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेच्यावतीने शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास तसेच छत्रपती शिवाजी उद्यानातील महाराजांच्या अर्धपुतळ्यास, मलाबादे चौकातील राज्याभिषेक सोहळा डिजीटल फलका आयुक्त पल्लवी पाटील यांच्याहस्ते अभिवादन करण्यात आले.

आमदार राहुल आवाडे, माजी आमदार प्रकाश आवाडे यांनीही पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महापालिकेचे कर्मचारी श्रीहर्ष माळगे यांची कन्या आराध्या हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित उत्कृष्ट भाषण केले.

यावेळी उपायुक्त नंदू परळकर, उपायुक्त राहुल मर्ढेकर, शिवतीर्थ समितीचे अध्यक्ष पुंडलिकभाऊ जाधव, माजी सभापती राजु बोंद्रे, सहआयुक्त विजय राजापुरे, सतिश मुळीक, भारत बोंगाडे, महेश बुचडे, आनंदा मकोटे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

## रुग्णसेवा कार्याबद्दल गौरव गुळवणी यांचा सत्कार

**विटा : हॅलो प्रभात**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन आयोजित कोल्हापूर येथील मेळाव्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे व कोर कमिटी सदस्य गौरव गुळवणी यांचा रुग्णसेवा कार्याबद्दल माजी आमदार शहाजी बापू पाटील व कक्ष प्रमुख मंगेश दादा चिवटे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी मधून आर्थिक मदत मिळवून देणे, रुग्णांना बिलात सवलत मिळवून देणे , रुग्णांना सर्व योजनांचा लाभ मिळवून देणे, तसेच रुग्णांना विविध ट्रस्ट कडून निधी उपलब्ध करून देणे अशा अनेक समाजकार्याच्या माध्यमातून केलेल्या कामाची दखल घेऊन गौरव गुळवणी यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी गौरव गुळवणी यांनी सांगितले की, आमचे दैवत स्व. अनिल भाऊ बाबर व आमदार सुहास बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत सांगली जिल्ह्यात जवळपास पावणेदोन कोटी रुपये पर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधी वितरित करण्यात आला. तसेच रुग्णांचे लाखो रुपयांचे बिलात सवलत व माफ करण्यात यश मिळाले.

तसेच जवळ पास १५० रुग्णांना महात्मा ज्योतिबा




फुले योजने अंतर्गत मोफत उपचार करून देण्यात आले. यावेळी नामदार राजेश क्षीरसागर, आमदार सुहास बाबर, आ.सुजित मिंचेकर, शिवसेना वैद्यकीय कक्षाचे कार्याध्यक्ष रामहरी राऊत, मार्गदर्शक युवराज नाना काकडे तसेच पश्चिम महाराष्ट्रातील शिवसेना वैद्यकीय कक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्यांची ३४ वर्षांनी पुन्हा भरली शाळा

### विद्यार्थ्यांच्या १९९१ मधील आठवणींना उजाळा

**वांगी : हॅलो प्रभात**

३४ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली. वयाची पन्नाशी गाठत आलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी बाकांवरच्या मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. निमित्त होते न्यू इंग्लिश स्कूल या हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचे.




वांगी (ता. कडेगांव) येथील न्यू इंग्लिश स्कूल या हायस्कूलच्या सन १९९०-९१ साली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन शाळेच्या मैदानात पार पडले. या स्नेहसंमेलनात ५० पैकी ४० विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे माजी शिक्षक आर. के. जाधव, एकनाथ गोखले, पी. बी. पाटील, वांगीच्या सरपंच सौ. वंदना सूर्यवंशी, उपसरपंच बाबासो सूर्यवंशी, शाळेचे मुख्याध्यापक विकास पाटील, प्रवीण जाधव, लक्ष्मण कांबळे, मारुती यादव हे प्रमुख उपस्थितीत होते.

**त्याचा सार्थ अभिमान वाटेल..!**

यावेळी बोलताना पी. बी. पाटील म्हणाले, ३४ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांना पाहून निश्चित आनंद वाटला. सर्व विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात काम करत आहेत. तुम्ही ज्या क्षेत्रात काम करत आहे त्याचा फायदा समाजातील प्रत्येक घटकाला होईल, असे काम करा म्हणजे आम्हाला त्याचा सार्थ अभिमान होईल.

यावेळी शाळेतील सवंगडी, शाळेचा वर्ग, लाकडी बाक यांची आठवण प्रत्येकाच्या मनात आयुष्यभर घर करून असते. शाळा सोडल्यावर पुन्हा लाकडी बाकांवर बसण्याची इच्छा अनेकांच्या मनात वारंवार येतेच. म्हणूनच अशा स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी अनेकांनी व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांशी उपस्थित शिक्षकांनी संवाद साधला. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व मित्र मैत्रिणींचा फेटा बांधून स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे स्वागत अनिल सूर्यवंशी, प्रास्ताविक मोहन मोहिते, तर आभार सुलभा माने यांनी मांडली. कार्यक्रमाचे आयोजन जयवंत घोरपडे , नारायण यमगर, प्रशांत कणसे, माणिक कुंभार, दिलीप कटरे, संजय देशपांडे, माधुरी कुंभार, कांचन पाटील, जालिंदर वडार यांनी केले होते.

## थोडक्यात महत्त्वाचे

### प्रलंबित सर्व विकासकामे मार्गी लागतील : खासदार माने व आमदार आवाडेंची ग्वाही

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

केंद्र आणि राज्य शासनाच्या डबल इंजिन धोरणामुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठा हातभार लागत आहे. महापालिकेच्या ६५७ कोटी रुपयांचा जीएसटी परताव्याचा प्रश्न नुकताच मार्गी लागला असून अन्य विकास कामंही गतीने होतील, अशी ग्वाही खासदार धैर्यशील माने आणि आमदार राहुल आवाडे यांनी दिली.



विकासकामांच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. महानगरपालिकेला जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्या निधीतून विविध भागांत स्थानिक विकासकामे करण्यात येणार आहेत. या कामांचा शुभारंभ खा. धैर्यशील माने, आ. राहुल आवाडे, आयुक्त पल्लवी पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी खा. माने आणि आ. आवाडे यांनी शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि नागरी जीवनमान उंचावण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सातत्याने आणि नियोजनपूर्वक कामे केली जातील. विकासाच्या या प्रवासाला नागरिकांचा साथ मिळेल, अशी अपेक्षाही व्यक्त केली. दरम्यान महापालिकेला मिळालेल्या नवीन शववाहिकेचे पूजन आणि शहापूर प्राथमिक शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास बाळासाहेब कलागते , अमृत भोसले, दीपक सुर्वे, महादेव गौड, राजू आलासे, प्रमोद बचाटे, रणजीत अणुसे, युवराज माळी यांच्यासह मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.




### केडगांव महावितरण कार्यक्षेत्रात विद्युत सुरक्षा सप्ताह

**दौंड : हॅलो प्रभात**

महावितरण कंपनीच्या केडगांव विभागीय व उपविभागीय कार्यालयाने विदयुत सुरक्षा, शुन्य अपघात संकल्पना व विजेची बचत या अनुषंगाने १ ते ६ जुन या कालावधीत सुरक्षा सप्ताह विविध कार्यक्रम घेऊन पार पाडल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता सागर कटके यांनी दिली. केडगांव महावितरणच्या वतीने कार्यकारी अभियंता श्विकास आल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली केडगांव, चौफुला परिसरातून विद्युत सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यासाठी मोटर सायकल रॅलीचे आयोजन केलेले होते. या मोटर सायकल रॅलीमध्ये केडगांव शाखेचे सहाय्यक अभियंता संतोष करनोर, पारगांव शाखेचे अभियंता रोहित तरटे, यवत शाखेचे नितिन झारगड, व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. महावितरण वर्धापन दिन व विद्युत सुरक्षा सप्ताह निमित्त केडगांव कार्यालयांत चित्रकला व निबंध स्पधेचे आयोजन केलेले होते. बारामती परिमंडळाचे अधिक्षक अभियंता दिपक लहामगे यांच्या पुढाकाराने महावितरण कंपनीचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहाने बारामती येथे साजरा करण्यात आला.

### पॅरीवेअरचे अंधेरीमध्ये नवीन डिस्प्ले स्टुडिओ सुरु




**मुंबई : हॅलो प्रभात**

पॅरीवेअर या बाथरूम सोल्यूशन्स क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे आपला नवीन डिस्प्ले स्टुडिओ सुरू केला आहे. लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड येथे असलेल्या या स्टुडिओमध्ये, ग्राहकांना आता बाथरूम उत्पादने जवळून पाहून आणि समजून घेऊन त्यांचा अनुभव घेता येईल. या डिस्प्ले स्टुडिओमध्ये, वॉश बेसिन, वॉटर क्लोसेट, थर्मोस्टॅटिक डायव्हर्टर, शॉवर, नळ, बॉडी जेट, हीटर, फ्लशिंग सिस्टम आणि बाथरूम फर्निचर यासारख्या विविध उत्पादनांचा थेट वापर करून पाहता येईल. यामुळे ग्राहकांना त्यांच्या बाथरूमसाठी कोणते उत्पादन योग्य असेल हे खरेदी करण्यापूर्वी योग्यरीत्या समजू शकेल. स्टुडिओचे वैशिष्ट्य म्हणजे पॅरीवेअरचे नवीन इटरनल कलेक्शन, ही एक लक्झरी रेंज आहे जी त्यांच्या बाथरूममध्ये स्टाईल आणि क्लास जोडू इच्छिणाऱ्यांसाठी डिझाइन केलेली आहे.

### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त 'शिवस्वराज्य गुढी'

**वाठार : हॅलो प्रभात**

येथील छ. शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त वाठार तर्फ वडगाव ग्रामपंचायतीमार्फत ङ्गशिवस्वराज्य गुढीफ उभारून उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरपंच सचिन कांबळे, उपसरपंच रेश्मा शिंदे, तसेच सदस्य महेश कुंभार, सुहास पाटील, सचिन कुंभार, अश्विनी कुंभार, रुकसाना नदाफ,



महेश शिर्के, राहुल पोवार हे उपस्थित होते. याशिवाय ग्रामस्थ विनायक पाटील, सुरेश नरके, शरद चौगुले, अरुण लट्ठे, निलेश शिंदे,विनायक भोसले, तसेच ग्रामसेवक व कर्मचारीवृंद यांचीही उपस्थिती लाभली. या उपक्रमामध्ये शिवराज्याभिषेक दिनाच्या ऐतिहासिक महत्त्वाचे स्मरण करत ग्रामस्थांनी राष्ट्रभक्ती आणि स्वराज्याची भावना जागवली.

हॅलो प्रभात
MY DISTRICT ५
मंगळवार, १० जून २०२५

## आ. राजेश क्षीरसागर यांचा सांगली जिल्हा दौरा

**सांगली : हॅलो प्रभात**

राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आ. राजेश क्षीरसागर हे सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा सविस्तर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे मंगळवार दिनांक १० जून रोजी सकाळी ११ वा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आगमन. सकाळी ११.३० वा जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका, सांगली अंतर्गत होणाऱ्या कामांचा आढावा बैठकीसाठी उपस्थिती. दुपारी १२.३० वा सांगली महानगरपालिका अंतर्गत शामनगर व शेरी नाला, सांगली येथील प्रकल्प कामांना भेटी.

# संमिश्र

## पिलीवच्या 'मोहिणी'ची यशाला गवसणी

### एलएलएम (मास्टर) परीक्षेत प्रथम श्रेणीत येण्याचा बहुमान

**पिलीव : हॅलो प्रभात**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य कै.गणपत देवकर यांची नात व पत्रकार रघुनाथ देवकर यांची कन्या ॲड. मोहिनी देवकर हिने सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२५ मध्ये घेतल्या गेलेल्या विधीज्ञ विभागातील एलएलएम (मास्टर) या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून प्रथम श्रेणीत येण्याचा बहुमान घेऊन यशाला गवसणी घालून पदवी प्राप्त केलेली आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, सोलापूर जिल्हा परिषदेचे मा .सभापती संग्रामसिंह जहागीरदार,पं.स.मा. सदस्य सौ.महाडिक, गुरुभक्ती भूषण हरिहरनंदन उर्फ रवींद्र करमाळकर महाराज, रामायण समिती पिलीव यांनी अभिनंदन केले. तसेच सद्गुरु श्री. श्री. सा.का.लि. श्री .श्रीनगर (राजेवाडी) चे चेअरमन एन. शेषागिरी राव, व्हा.चेअरमन डॉ.बाळासाहेब कर्णवर-पाटील, संचालिका सौ उषाताई मार्कड व संचालक मंडळांनी यथोचित सन्मान केला. या उत्तुंग यशाबद्दल आपले विचार व्यक्त करताना ॲड. मोहिणी देवकर यांनी सांगितले की, माझ्या या शैक्षणिक कालावधीत सर्व परमेश्वरांच्या आणि सर्वांच्या आशीर्वादाने मला यश मिळाले असून माझे आजोबा कै.गणपत बाळासो देवकर, तुकाराम जगताप, माझे चुलते कै.वसंत देवकर यांनी माझ्या बालपणीच मला विधिज्ञ क्षेत्रामध्ये जाण्याचा सल्ला दिला असल्याने मी या क्षेत्रामध्ये वाहून घेतले. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल विविध संस्था, तरुण मंडळे.नातेवाईक यांच्याकडून तिच्यावरती कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## राजे रामराव महाविद्यालयात डॉ.बापूजी साळुंखे जयंती साजरी

**जत : हॅलो प्रभात**

येथील राजे रामराव महाविद्यालय येथे श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे संकल्पक संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.महादेव करेन्नवर यांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे, स्वामी विवेकानंद व रामराव महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे सामाजिक, शैक्षणिक व स्वातंत्र्य लढ्यातील कार्याचा आढावा घेऊन त्यांचे शैक्षणिक कार्य उलगडून दाखवले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.शिवाजी कुलाल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मेडिकॉन २०२५ चे पुण्यात यशस्वी आयोजन



**पुणे : हॅलो प्रभात**

मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशन आयोजित मेडिकॉन २०२५ या वैद्यकीय परिषदेने पुण्यातील इंडियन मेडिकल असोसिएशन हॉलमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणत अनुभवाधारित शिक्षणाचे एक अद्वितीय व्यासपीठ उभारले. पुस्तकांच्या पलीकडे : रंजक केसेसद्वारे शिक्षण ही संकल्पना घेऊन भरविण्यात आलेल्या या परिषदेला २०० पेक्षा अधिक डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. संजय गुप्ते यांनी वैद्यकीय क्षेत्रातील रूढ विचारांना छेद देणारे अनुभव सांगत उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी डॉ. हसमुख गुजर, डॉ. परेश गांधी, डॉ. हिमांशु पोफळे, डॉ. प्रमोद त्रिपाठी, डॉ. सुश्रुत सावे, डॉ. सचिन यादव, डॉ. रोहित शूल, डॉ. राजेंद्र शिंपी, डॉ. आकाश गंगणे, डॉ. निकिता सोनवणे, तसेच डॉ. ज्योती शिंदे, डॉ. मानसी पवार, डॉ. प्रेरणा बर्वे, डॉ. कुशल महाजन आणि डॉ. अमित डेव्हिड यांच्यासह विविध तज्ज्ञांनी फुफ्फुसविकार, संसर्गजन्य रोग, मानसिक आरोग्य, ॲन्डोक्रायनोलॉजी, सर्जिकल केसेस अशा अनेक विषयांवर अनुभवाधारित सादरीकरणे केली.

क्षयरोगावर सादरीकरण करताना डॉ. अमित डेव्हिड म्हणाले,योग्य वेळी निदान आणि प्रभावी औषधोपचाराच्या माध्यमातून आपण क्षयरोगावर नियंत्रण मिळवू शकतो. जर हीच रणनीती सातत्याने राबवली, तर २०३० पर्यंत भारत क्षयरोगमुक्त होऊ शकतो.

# 'जयश्रीताई' कुरणे यांचा जनसुराज्य शक्ती पक्षात प्रवेश

**मिरज : हॅलो प्रभात**

सांगली जिल्ह्यामध्ये जनसुराज्य शक्ती पक्षात प्रवेशाची शृंखला सुरूच असून प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्या धडाडीच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना पक्ष्यातील ग्रामीणसह शहरी भागातील अनेक मातब्बर नेते प्रवेशाच्या वाटेवर आहेत ,मिरज शहरातून भाजप महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष जयश्रीताई कुरणे यांनी महिला समर्थकांच्या सोबत जनसुराज्य शक्ती पक्षात प्रवेश केला ,तर मिरज पूर्व भागातील एरंडोली गावातून असंख्य कार्यकर्त्यांनी जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्या हस्ते प्रवेश

### समित कदम यांच्या उपस्थितीत झाला पक्ष प्रवेश



पार पडला. यावेळी माजी नगरसेवक ज्येष्ठ नेते महादेव कुरणे, माजी नगरसेवक आनंदा देवमाने, समिर मलगावे, जिल्हा प्रमुख आनंदसागर पुजारी, शहर जिल्हाध्यक्ष डॉ. पंकज म्हेत्रे, अनुसूचीत जाती जमाती जिल्हा अध्यक्ष प्रविंन धेंडे, मिरज शहराध्यक्ष योगेश दरवंदर, शिवलिंग मेंढे, सुशील माळी, विनायक शेरबंदे, कासम मुल्ला, विनायक रुईकर, जयसिंग चव्हाण, अमर पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. जनसुराज्य शक्ती पक्षात प्रवेशासाठी रांगा लागल्या असून लवकरच आणखीन मोठे धमाके पाहायला मिळतील असे सूचक वक्तव्य यावेळी समित कदम यांनी केले.

## चिंचोली गावाने आत्मविश्वास निर्माण केला आहे

**रणधीर नाईक**

**शिराळा : हॅलो प्रभात**

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निश्चित यश संपादन करून चांगल्या नोकरीची संधी आपण मिळवू असा आत्मविश्वास चिंचोली गावामध्ये निर्माण झाल्या मुळे अनेक मुले यशस्वी झालेले आपल्याला पाहायला मिळतात हे तालुक्याच्या दृष्टीने भूषणावळ असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रणधीर नाईक यांनी केले.

चिंचोली (ता. शिराळा) येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार महामंडळ अंतर्गत नोंदणीकृत कामगारांना साहित्याची वाटप करण्यात आले त्यावेळी नाईक बोलत होते. श्री.नाईक पुढे म्हणाले,महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून एकदा नोंदणी झाली की अनेक जीवनावश्यक वेगवेगळ्या योजना आपल्याला मिळू शकतात. यामध्ये आपल्या प्राथमिक शाळेच्या मुलांच्या पासून उच्च शिक्षणापर्यंत स्कॉलरशिप, मुलाच्या विवाह साठी व नोंदणीकृत कामगारांच्या घरी कोण मृत्युमुखी पडले तर आर्थिक सहाय्य म्हणून मदत या मंडळाकडून होत असते. अशा अनेक योजना या मंडळाच्या माध्यमातून आपल्याला मिळू शकतात ही आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. आणि त्याचा पाठपुरावा आपल्याकडून होणे तितकेच महत्त्वाचे आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून मोठे जाळे विणले आहे मोठ-मोठे व्यवसाय ग्रामीण भागामध्ये आज उभा राहत असलेली पहावयास मिळत आहेत. आज शासनाच्या अनेक योजना सुरू आहेत या सामान्य कष्टकरी कामगारापर्यंत पोचवून या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गावातील युवकांनी पुढाकार घेऊन काम करण्याचे आव्हान नाईक यांनी केले.

यावेळी शिवाजी जाधव,सुनील घोलप, तानाजी जाधव,आनंदा बानकर, संदीप जाधव, सुरेश जाधव,सखाराम पाटील, उपसरपंच रुपाली जाधव, सुवर्णा जाधव, पुष्पा जाधव, धनश्री जाधव,वर्षा जाधव, नंदा जाधव, संगीता आटुगडे,संजीवनी जाधव, विजय मस्के,बाबुराव परीट आदी उपस्थित होते.



## जीवनात यशस्वीतेसाठी आत्मविश्वास महत्त्वाचा : प्रा.साहेबराव दवंगे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

दहावी-बारावी उत्तीर्ण झाल्यानंतरचा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमातून आणि मिळवलेल्या गुणातून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासाचे गणित अवलंबून असते. मात्र अशाही परिस्थितीमध्ये कमी गुण मिळाले तरी विद्यार्थ्यांनी खचून न जाता स्वतःच्या आत्मविश्वासाच्या बळावर शिक्षणातील कोणताही पर्याय निवडून परिश्रम घेत आपल्या जीवनात यशस्वी होता येते. मात्र; हे सर्व करताना संस्कारही तितकेच महत्त्वाचे असल्याचा मौलिक सल्ला करियर मार्गदर्शक प्रा. साहेबराव दवंगे यांनी दिला.कोपरगाव तालुक्यातील वारी येथील राहुल दादा मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने वारी पंचक्रोशीतील दहावी-बारावीतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी (दि.६) दहावी-बारावी नंतर काय ? या अनुषंगाने करियर मार्गदर्शन शिबिर तसेच विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्रा. साहेबराव दवंगे बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कोपरगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब साबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वारी गावचे माजी उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते रामदास सोनवणे होते. कार्यक्रमाची राहुल दादा टेके यांच्यासह महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

प्रा. दवंगे म्हणाले, जीवनात तारुण्यदशा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या काळात मनुष्य कोणतेही आव्हान पेलू शकतो. यातून कोणत्याही परिस्थितीवर मात करता येणे शक्य होते. त्यामुळेच योग्य वेळी योग्य संधीचा उपयोग केल्यास पुढील आयुष्य सुखकर होऊन एक उत्तम व संस्कारक्षम आयुष्य जगता येते. त्यामुळे नेहमी प्रयत्नवादी आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. यावेळी दहावी-बारावी सह, पाचवी आठवी शिष्यवृत्ती, मंथन परीक्षा, गांधी रिसर्च फाऊंडेशन विविध परीक्षांमध्ये, क्रीडा क्षेत्रात, महाज्योती अंतर्गत मोबाईल टॅब मिळवत प्रावीण्य मिळवलेल्या शंभरपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा शाल, गुलाब पुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ट्रस्टच्या मार्गदर्शक स्मिता काबरा यांच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रकाशराव गोर्डे, रपंच सतीशराव कानडे, मुख्याध्यापक एफ. एस. शेख, माजी उपसरपंच बाबासाहेब शिंदे, माजी पं. स. सदस्य अशोकराव कानडे, परसराम टेके, नानासाहेब टेके, ह.भ.प. विनायक महाराज टेके, ग्रा. पं.सदस्य योगेश झाल्टे, वसंतराव गोरे यांच्यासह विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण आहेर व कैलास शेळके यांनी केले तर वसंत जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ट्रस्टचे सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त बांधकाम कामगारांना भांडी संच वाटप

**पेठ : हॅलो प्रभात**

अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त लोकराज्य विद्या फौंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धेचे उद्घाटन आणि बांधकाम कामगारांना भांडी संच वाटप सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक,भाजपा नेते मा.राहुल महाडीक यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकराज्य परिवाराच्या मार्गदर्शक वैशालीताई डांगे शामसंध्या फौंडेशनच्या संचालक ज्ञानेश्वरी देशपांडे नूतन सांस्कृतिक कला मंचच्या शोभाताई लाखे आझाद जमादार स्वराज्य कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक जाधव यांच्यासह विविध मान्यवर,पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी लोकराज्यच्या अध्यक्षा अलकाताई पुजारी,उपाध्यक्ष सुहासभाऊ कदम, डॉ. माणिक हिरवे,सुवर्णा यमगर,विश्वनाथ देसाई यांच्यासह अनेक कार्यकर्ते,स्पर्धक,पालक व बांधकाम कामगार बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नृसिंहवाडीत ८२ जणांचे रक्तदान



### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त केले होते आयोजन

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील अजिंक्य मंडळाधिकारी प्रमुख व विक्रमी रक्तदाते सामाजिक कार्यकर्ते मंगेश पुजारी यांच्या पुढाकाराने व तुलसी ब्लड बँक जयसिंगपूर यांच्या सहकार्याने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रविवारी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ८२ रक्तदात्यांनी रक्तदान करून त्या सामाजिक उपक्रमास हातभार लावला. येथील विठ्ठल मंदिर सभागृहात हे रक्तदान शिबिर पार पडले. याचे उद्घाटन माजी सरपंच धनाजीराव जगदाळे, उपसरपंच रमेश मोरे, ग्राप सदस्य चेतन गवळी, शिवसेनेचे प्रतीक धनवडे यांच्या हस्ते शिवप्रतिमा पूजन करून उद्घाटन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे यंदाचे पंधरावे वर्षे होते. सकाळी १० वाजल्यापासून सांगितले ५ वाजेपर्यंत नृसिंहवाडीत येणाऱ्या भाविकांच्या वतीने ८२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मंगेश पुजारी यांच्या सामाजिक उपक्रमाला हातभार लावला.मंगेश पुजारी यांनी आत्तापर्यंत ८५ वेळा विक्रमी रक्तदान करून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या पुढाकारणेच या रक्तदान शिबिराच्या आयोजन करण्यात आले. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी अजिंक्य मंडळाचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी त्याचबरोबर गावातील विविध संस्था बँका पतसंस्था तरुण मंडळे दत्त देव संस्थान ग्रामपंचायत यांचे विशेष सहकार्य मिळाले. रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या.

## मनसेचे मोफत मर्दानी खेळांचे प्रशिक्षण उत्साहात



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

छ. शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची चिरंतन आठवण रहावी आणि धाडस वाढावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने तरुणांना मोफत मर्दानी खेळ, भाला, लाठी-काठी प्रशिक्षण देण्यात आले. उत्साहात १० दिवस चाललेल्या या प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला.मनसेचे शहराध्यक्ष रवी गोंदकर यांनी या महत्वपूर्ण प्रशिक्षणाचे राजर्षी शाहू हायस्कूलमध्ये आयोजन केले होते. यामध्ये सुहास मोरतले, कीर्ती बोणगे , मेघना मुसळे, हर्षदा पोरे यांनी या प्रशिक्षकांनी शिबीरात प्रशिक्षण दिले. शिबीरात शहर परिसरातील युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

समारोपाच्या कार्यक्रमात निर्भया पथकाचे प्रमुख गवळी यांच्या हस्ते प्रशिक्षकांना आभार पत्र देऊन सत्कार करण्यात आला. तर प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले. यावोळी मनसेचे शहराध्यक्ष रवि गोंदकर यांनी मनसेच्यावतीने अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवले जातात. त्यास सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगितले.

# डी. वाय. पाटील कृषी विद्यापीठाचा वर्ल्ड ट्रेडशी सामंजस्य करार

**मुंबई: हॅलो प्रभात**

डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे व वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई यांच्यात नुकताच सामंजस्य करार संपन्न झाला. या करारामुळे दोन्ही संस्थांना विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर संशोधन करण्यासाठी नवे व्यासपीठ मिळाले आहे. या करारांतर्गत आंतरराष्ट्रीय ट्रेड, सप्लाय चेन मॅनेजमेंट, आयात निर्यात वरती आधारित विविध पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली. यावेळी डी.वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. के. प्रथापन, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईच्या संचालिका श्रीमती आकृती बागवे, प्रिया पानसरे, संतोष कोत्रे व तृप्ती चक्रवर्ती आदी मान्यवर उपस्थित होते. वर्ल्ड ट्रेड इन्स्टिट्यूट हे शैक्षणिक संस्था आणि उद्योगांना जोडण्याचे कार्य करते तसेच विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोन आणि औद्योगिक भविष्यासाठी व्यावहारिक कौशल्ये प्रदान करते. डी. वाय. पाटील कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापन यांनी डी वाय पाटील ग्रुप बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.ते म्हणाले जागतिक बाजारपेठेच्या गरजांशी शैक्षणिक क्षेत्राची पूर्तता करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून आम्ही व्यापार शिक्षण, उद्योजकता आणि औद्योगिक करिअरमध्ये उद्योग-संबंधित कार्यक्रम सुरू करण्यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि डी वाय पाटील कृषी व तंत्र विद्यापीठात सामंजस्य करार झाला आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने आयोजित केलेल्या आगामी जागतिक आर्थिक शिखर परिषदेत शाश्वत शेतीमध्ये कृषी-तंत्रज्ञान आणि नवोपक्रम एक महत्त्वाचा विषय म्हणून एकत्रित करण्यावर आम्ही चर्चा केली. वर्ल्ड ट्रेड सेंटर हे एक प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे जो धोरणकर्ते, जागतिक व्यावसायिक आणि विकास संस्थांना एकत्र आणण्याचे कार्य करते.या कराराबद्दल कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कुलसचिव प्रा.डॉ जयेंद्र खोत यांनी सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ३००० /- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ५००० /- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | ७५०० /- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976